**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर वेबिनारचे आयोजन**

**विद्यापीठ एच.आर.डी.सी. च्या नॅशनल रिसोर्स सेंटरचा उपक्रम**

अमरावती - (दि. २०.०६.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मानव संसाधन विकास केंद्रातंर्गत असलेल्या नॅशनल रिसोर्स सेंटरच्यावतीने नुकतेच लागू झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० वर विद्यापीठ अनुदान आयोग प्रायोजित वेबिनारचे आयोजन दि. २२ ते २५ जून, २०२२ या कालावधीत करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांना या निमित्ताने अद्ययावत ज्ञानाची मेजवानी प्राप्त होणार आहे.

दि. २२ जून रोजी दुपारी १.०० वाजता विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या शुभहस्ते वेबिनारचे उद्घाटन होणार असून याप्रसंगी ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर मार्गदर्शन करतील. त्यानंतर 'मल्टीडिसिप्लीनरी अप्रोच इन एन.ई.पी.' या विषयावर महिला महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील मार्गदर्शन करतील.

दि. २३ जून रोजी दुपारी १२.०० वाजता 'ॲकॅडेमिक रिसर्च इंटिग्रिटी' या विषयावर जवाहरलाल नेहरु विद्यापीठ (जे.एन.यु.), नवी दिल्ली येथील स्कूल ऑफ लाईफ सायन्सेसचे प्रा. अरुण खरात मार्गदर्शन करतील. दि. २४ जून रोजी दुपारी १२.०० वाजता विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे मार्गदर्शनपर भाषण करणार असून त्यानंतर 'एन.एस.क्यू.एफ. ॲन्ड इट्स अलायमेन्ट' या विषयावर एच.व्ही.पी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अमरावतीचे प्राचार्य डॉ. अनंत मराठे मार्गदर्शन करतील. दि. २५ जून रोजी दुपारी १२.०० वाजता 'इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन' या विषयावर मुंबई विद्यापीठ येथील स्कूल ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स ॲन्ड स्ट्रॅटेजिक स्टडीजचे संचालक प्रा. शैलेंद्र देवलणकर मार्गदर्शन करतील.

सदर वेबिनारमध्ये नोंदणी करण्यासाठी https://forms.gle/PwN641SdFBDHgVAJ6 ही लिंक देण्यात आली असून वेबिनारला जास्तीतजास्त संख्येने सहभागी होवून लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. प्रसाद वाडेगावकर व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. वर्षा कुमार यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/०६/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/